पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

# अनंतराव पवार महाविद्यालय

ता.मुळशी जिल्हा पुणे ४१२११५

**सांस्कृतिक विभाग**

अहवाल

दिनांक ०४/०५/२०२२

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अनंतराव पवार महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या गुणगौरवासाठी सकाळी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांनी केले. प्रास्ताविकामधून त्यांनी महाविद्यालयाच्या उत्तरोत्तर विकासाची वाटचाल नमूद केली. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांच्या कौतुकासाठी हा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ महत्त्वाचा ठरत असतो. यातूनच प्रेरणा घेत विद्यार्थी आपल्या भविष्याची वाटचाल करत असतो, असे मत प्रतिपादन केले.दत्ता कोहिनकर आणि मकरंद टिल्लू यांनी आपल्या खुमासदार शैलीत तणावमुक्तीसाठी विविध प्रात्यक्षिके करत, हास्याचे फवारे उडवत उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण केला. यावेळी उपस्थितांनी प्रचंड टाळ्यांची साथ देत प्रतिसाद दिला. मकरंद टिल्लू यांनी आपल्या मनोगतातून पाणी गळती बंद करून पाणी बचत करण्याचे आवाहनही केले. उपकुलसचिव मुंजाजी रासवे म्हणाले की, अत्यंत ग्रामीण भागामध्ये पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने शैक्षणिक साधने उपलब्ध करून दिली आहेत, या साधनांचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयापर्यंत गेले पाहिजे. यापुढे ते म्हणाले की, आपण नेहमी आपल्या मनात चांगले विचार घेऊनच कार्यप्रवण राहिले पाहिजे. यावेळी महाविद्यालयात विविध विद्याशाखांमध्ये, विविध उपक्रमांमध्ये विशेष नैपुण्य मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा, प्रशासकीय सेवकांचा मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील इतिहास विभागाचे विभागप्रमुख डॉ. रामकृष्ण ढेरे यांनी राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळविणाऱ्या खेळाडूला एक हजार रुपयाचे बक्षीस दिले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. समारंभासाठी विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक समिती प्रमुख आणि सदस्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. मकरंद टिल्लू म्हणाले, व्यसन करायला लोक लाजत नाहीत; आपण हसायला का लाजावे, यामुळे तणावमुक्ती साधली जाते, माणूस एकमेव प्राणी आहे की तो विचारांचा रवंथ करतो, त्यामुळे यशस्वी होतो.

वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या द्वितीय सत्रात महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला.त्यामध्ये काव्यवाचन, गीतगायन,मृदंग

वादन. नृत्य इत्यादी प्रकार विद्यार्थ्यांनी केले. काव्यवाचन या घटकामध्ये अभिषेक मारणे, प्रीतम कुमार इंगळे, प्रिया बोरकर,इत्यादी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मृदंग वादन या कलाप्रकारमध्ये प्रतीक्षा भालेकर आणि प्रा. दत्तात्रय फटांगडे यांनी आपली कला सादर केली.नृत्य या घटकामध्ये प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली.

या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे उपकुलसचिव मुंजाजी रासवे, मकरंद टिल्लू (प्रसिद्ध लेखक, एकपात्री हास्य कलाकार, लाफ्टर योगा ट्रेनर), दत्ता कोहिनकर (माईंड पावर ट्रेनर) उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी, सुनीलभाऊ चांदेरे (अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक), उपप्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे, डॉ. प्रवीण चोळके, मा. श्री. सुरज गोळे, मोहन गोळे, अंजनवेलचे संचालक राहुल जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. समारंभासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्रजी घाडगे, मानद सचिव श्री. संदीप कदमसाहेब, सहसचिव . एल. एम. पवार, खजिनदार मोहनराव देशमुख, सहसचिव प्रशासन ए. एम. जाधव यांचे अनमोल सहकार्य मिळाले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक विभागातील डॉ. रामकृष्ण ढेरे, प्रा. अविनाश हुंबरे,डॉ. रेखा जोशी प्रा. दत्तात्रय फटांगडे यांनी प्रयत्न केले. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दत्तात्रय फटांगडे यांनी तर आभार प्रा. अविनाश हुंबरे यांनी मानले.

सांस्कृतिक विभाग प्रमुख
डॉ. रामकृष्ण ढेरे

प्राचार्य
डॉ. शर्मिला चौधरी